दुरध्वनी व फॅक्स क्र.0231/2528351 महाराष्ट्र शासन वेबसाईट:www.preias-kop.in

**भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर**

**( प्री-आय.ए.एस. ट्रेनिंग सेंटर )**

**मंडलिक पार्क (राजारामपुरी ) समोर, कोल्हापूर - 416004**

**E-mail- pitckop1985@gmail.com**

---

**केंद्रीय लोकसेवा आयोग-2015 परीक्षांकरीता प्रशिक्षण-2015**

केंद्रीय लोकसेवा आयोग 2015 परिक्षेकरीता प्री-आय.ए.एस.ट्रेनिंग सेंटर,कोल्हापूर यांचे मार्फत पुर्णवेळ प्रशिक्षण देण्याकरीता प्रवेश परीक्षा दि.28 डिसेंबर 2014 रोजी घेणेत येणार आहे.

**1.प्रवेश क्षमता:-** 60+10+10 (10 जागा अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांकरिता राखीव व 10 जागा BARTI द्वारा अनुदानीत)

**2. प्रवेश परिक्षेचे स्वरूप:-** प्रवेश परीक्षा 200 गुणांची असून सामान्य अध्ययन व सी-सॅट या विषयावर असून वरील दिवशी दू.12.00 ते 2.00 या वेळेत राहील.प्रश्नांचे स्वरूप वस्तुनिष्ठ असून चुकीचे उत्तराकरीता नकारात्मक गुण पध्दती राहील.( चुकीचे उत्तराकरीता प्रश्नांच्या गुणाच्या 1/3 गुण वजा केले जातील.)

**3.वसतिगृह प्रवेश मर्यादित असून गुणवत्ता व प्रचलित नियमानुसार होतील.**

**4. प्रवेश परीक्षा अर्हता:- अ)** कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी परीक्षा उत्तीर्ण **ब)** उमेदवाराचे वय 01 ऑगष्ट 2015 रोजी 21 ते 32 वर्ष ( 3 वर्ष इ.मा.व./वि.जा. भ.जा./वि.मा.प्र व 5 वर्ष अनुसुचित जाती/जमातीसाठी शिथिलक्षम आहे.) **क)** उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी असला पाहिजे (Domicile of Maharashtra Certificate) किंवा उमेदवार महाराष्ट्र कर्नाटक वादग्रस्त सिमाभागातील रहिवाशी असल्यास त्याची/त्याच्या अर्जात तो/ती पात्रता परीक्षा महाराष्ट्र कर्नाटक वादग्रस्त सीमा भागातील गाव किंवा शहरातील संस्थेमधून उतीर्ण झाल्याचे नमुद करणे आवश्यक असेल.तसेच अर्जासोबत संबंधित विद्यार्थी/ विद्यार्थिनीचे पालक महाराष्ट्र कर्नाटक वादग्रस्त सीमा भागातील रहिवाशी असल्याचे जिल्हाधिकारी यांचे प्रमाणपत्र आणि विद्यार्थीपात्रता परीक्षा संस्थेतून उत्तीर्ण झाल्याचे व त्याची/ तिची मातृभाषा मराठी असल्याचे संस्थेच्या प्राचार्यांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.तसेच इ.10 ची परीक्षा मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.**ड.)** या केंद्रामध्ये प्रारंभिक अथवा मुख्य परीक्षा प्रशिक्षण सत्राचा लाभ घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षेस बसता येणार नाही. **इ)** सदर प्रशिक्षण पूर्णवेळ प्रशिक्षण असल्यामुळे अन्यत्र नोकरी अथवा शैक्षणीक संस्थेत प्रवेश घेता येणार नाही. **फ)** वैद्यकीय पदवी धारकांनी Internship पूर्ण करणे आवश्यक आहे.

**5. प्रवेश परीक्षेच्या अर्जासंबंधी सविस्तर माहिती http://oasis.mkcl.org/pitckop या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

**सही/-**

**(डॉ.एस.बी.महाराज-पाटील)**

**संचालक**

**भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र**

**कोल्हापूर**